लोकमत
epaper.lokmat.com ६
कोल्हापूर, शुक्रवार, दि. २ ऑगस्ट २०२४

# नोकरी करत पीएसआयपदाला गवसणी

## मानकात्रेवाडीच्या मयूरी पाटीलचे यश : खासगी कंपनीत काम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पोस्ट कार्यालयात नोकरी करत उरलेल्या वेळात अभ्यास करून मानकात्रेवाडी (ता.पन्हाळा) येथील मयूरी तुकाराम पाटील यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेचा गुरुवारी निकाल जाहीर झाला. यात मयूरी यांनी यश मिळविले. खासगी कंपनीत काम करत करत अभ्यासाचे वेळापत्रक तयार करत मयूरीने हे यश मिळवले आहे. मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करत मन लावून अभ्यास केला. त्यात सातत्य ठेवले त्यामुळेच हे यश मिळवू शकल्याचे मयूरीने यावेळी सांगितले. गावातील संजयसिंह माध्यमिक विद्यालयात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. पन्हाळा येथील संजीवन नॉलेज सिटीतील छत्रपती शिवाजी महाराज ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावी बारावीपर्यंतचे तर कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेजमध्ये गणित विषयातून पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतले.

वडील तुकाराम पाटील हे शेती करतात तर आई संगीता पाटील प्राथमिक शिक्षिका आहेत. मला प्रा. जॉर्ज क्रुझ यांचे मार्गदर्शन लाभले असून आई-वडील, बहीण, भाऊ आणि नातेवाईकांचे प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

लोकमत
शुक्रवार ९.८.२०२३

# शिक्षकांनो, गुणवत्तेसाठी नेहमी सैनिकांसारखे दक्ष राहा

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर : बापूजी साळुंखे स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सध्याच्या पालकांना गुणवत्ता, दर्जात्मक पद्धतीचे शिक्षण हवे आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी रांगा लागत असताना शासकीय अनुदानित विद्यापीठांना विद्यार्थी मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षकांनी काळानुसार बदलत सीमेवरील सैनिकांसारखे नेहमी दक्ष राहून गुणवत्ता टिकवावी, अन्यथा जे बदलणार नाहीत त्यांना विद्यार्थी मिळणे मुश्कील होईल, अशी भीती राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी गुरुवारी व्यक्त केली.



कोल्हापुरात गुरुवारी आयोजित व्याख्यानात डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आर. आर. कुंभार, डॉ. अभयकुमार साळुंखे, श्रीराम साळुंखे, कौस्तुभ गावडे उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. देवळाणकर यांचे 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर व्याख्यान झाले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, जगभरातील अनेक देशांमध्ये आपले विद्यार्थी शिक्षण घेऊन शुल्काच्या माध्यमातून त्यांचा जीडीपी वाढवत आहेत. हे विद्यार्थी का बाहेर जात आहेत याचा विचार करणे गरजेचे असून, अस्तित्व टिकवण्यासाठी आता प्रत्येकाला बदलावे लागेल.

यावेळी डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी विवेकांनद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासूनचा प्रवास उलगडला. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परिचय करून दिला. संस्थेच्या कला शिक्षकांच्या कलाकृतीचे प्रदर्शन मान्यवरांच्या हस्ते झाले. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहसंचालक अशोक उबाळे, श्रीराम साळुंखे, आदी उपस्थित होते.

### 'विवेकानंद'ने विद्यापीठाकडे वाटचाल करावी

स्वामी विवेकानंद संस्था ही राज्यातील नामांकित संस्था आहे. या संस्थेची तीन समूह विद्यापीठे होऊ शकतात. त्यांच्यात ती क्षमता आहे. त्यामुळे या संस्थेने स्वायत्तमध्ये न अडकता आता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी. त्यासाठी लागेल ती मदत करू, अशी ग्वाही डॉ. देवळाणकर यांनी दिली.

09/08/24
9.8.24

पुण्य नगरी
गुरुवार, १ ऑगस्ट २०२४

# विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धन चळवळ हाती घ्यावी

## सिने अभिनेते सयाजी शिंदे : 'विवेकानंद'मध्ये एमबीए-एमसीए विद्याशाखेचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लाखो विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची चळवळ हाती घ्यावी. झाड, फूल, फळ, पान यामध्ये मला माझी आई दिसते. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. स्वामी विवेकानंदांचे विचार आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची शिकवण विद्यार्थ्यांनी अवलंबावी, असे प्रतिपादन अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले.



विवेकानंद कॉलेजमधील नवीन विद्याशाखा एम. बी. ए. आणि एम. सी. ए. च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. स्वागत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. पाहुण्यांची ओळख सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी करून दिली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. अशोक पाटील यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा, श्रम आणि स्वावलंबन या गोष्टी विद्यार्थ्यांमध्ये रुजाव्यात, यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले, असे प्रतिपादन केले. याप्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी मत मांडले. यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगीताई गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थी ऋषी डोंगरे आणि प्रा. सतीश उपळावीकर यांनी रेखाटलेली रेखाचित्रे सयाजी शिंदे यांना भेट म्हणून दिली. यावेळी प्राचार्य वीरेन भिर्डी, आर. के. पाटील, विराज जाधव, अमित आव्हाड, विजय पुजारी, अश्विनी चौगुले, सर्जेराव खोत यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आभार एम.बी.ए. चे विभागप्रमुख प्रा. विराज जाधव यांनी मानले. कार्यक्रमास कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.

Pn.

P2 7.2024

# शिक्षकांनी सैनिकाप्रमाणे कष्ट केल्यास देश महासत्ता

## राज्य उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना स्मृतिदिनी अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आगामी २५ वर्षांच्या अमृतकाळात शिक्षकांनी सीमेवरील सैनिकाप्रमाणे कष्ट केल्यास भारत महासत्ता होईल. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने विवेकानंद विद्यापीठाची स्थापना करून बदलत्या शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय भूमिका घ्यावी, असे आवाहन उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिन कार्यक्रमात बोलताना राज्य उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर.

डॉ. देवळाणकर म्हणाले, भारतीय ज्ञानपरंपरा आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमामुळे भारत विकसनशीलतेकडून विकसित भारताकडे जाण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे. गुणवत्ता शिक्षण नसल्याने मोठ्या प्रमाणात परदेशी जाणारा विद्यार्थी ही समस्या आहे. म्हणून देशात पायाभूत सुविधा आणि मानव संसाधने समृद्ध करण्यासाठी कार्यक्रम राबवले जात आहेत.

प्राचार्य साळुंखे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संघर्षातून बहुजन समाजाला शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. त्यांच्या स्मृतिदिनी शिक्षकांनी बापूजींच्या विचार व कार्याचा वारसा आत्मसात करून विद्यार्थी घडवावेत व संस्थेचा नावलौकिक वाढवावा.

प्रास्ताविकात मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे म्हणाले, डॉ. बापूजी साळुंखे यांनी लावलेल्या ज्ञानाच्या रोपट्याचा ज्ञानवटवृक्ष झालेला आहे. शब्दांचे धन मानून गुरुदेव कार्यकर्ते ज्ञानार्जन करत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणक, आधुनिक तंत्रज्ञान यांची सोबत करत संस्था दर्जात्मक विकास साधत आहे.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी करून दिला. याप्रसंगी संस्थेतील गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण व ग्रामस्थ सुखदेव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विभागप्रमुख श्रीराम साळुंखे उपस्थित होते. यावेळी महेश हिरेमठ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे रचित संस्था प्रार्थना व भक्तिगीते सादर केली. आभार सहसचिव (अर्थ) सीताराम गवळी यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले.

09/08/24
9.8.24

पुण्य नगरी
कोल्हापूर । बुधवार, २१ ऑगस्ट २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये इंडक्शन प्रोग्राम उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील अभ्यासक्रम, सोयीसुविधा, विविध विभागांची माहिती होण्यासाठी इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रम, सांस्कृतिक, एनएसएस, एनसीसी, परीक्षा विभाग व उपलब्ध सोयीसुविधांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. एस. पी. थोरात होते.

यावेळी डॉ. सी. बी. पाटील यांनी नवीन शैक्षणिक धोरण व त्यातील विद्यार्थ्यांच्या विद्यार्थ्यांसाठीच्या तरतुदी, कौशल्य शिक्षणाचे महत्त्व याची माहिती दिली. डॉ. विशाल वाघमारे यांनी केंद्र, राज्य शासन व महाविद्यालयीन शिष्यवृत्तीबद्दल सांगितले.

प्रा. डॉ.जी.जे. नवाथे यांनी परीक्षा पद्धतीचे स्वरूप व मूल्यांकन याविषयी माहिती दिली. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. अरित महात यांनी कॉलेजमध्ये राबवल्या जाणाऱ्या सांस्कृतिक उपक्रमांची माहिती आणि त्यातून मिळणाऱ्या यशाविषयी सांगितले. एनएसएस विभागप्रमुख प्रा. संदीप पाटील यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि राबवली जाणारे उपक्रम विषद केले.

कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. आयोजनासाठी महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर.बी.जोग यांचे सहकार्य लाभले.

प्रास्ताविक डॉ. संजय अंकुशराव यांनी केले. आभार डॉ. बी. टी. दांगट यांनी मानले. तर सूत्रसंचालन डॉ. स्नेहा देसाई आणि डॉ. शिल्पा खैरमोडे यांनी केले.

पुण्य नगरी
कोल्हापूर । शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# 'विवेकानंद'चा साहिल मॅरेथॉन स्पर्धेत प्रथम

**कोल्हापूर :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कोल्हापूर एनसीसी ग्रुपतर्फे पाच किलोमीटर मॅरेथॉनचे एनसीसी भवन येथे आयोजन केले होते. या स्पर्धेत शहरातील ४००, तर विवेकानंद महाविद्यालयातील ३० छात्रांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत सार्जंट साहिल तुरटे याने प्रथम क्रमांक पटकावला. स्पर्धेतील सहभागासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, रजिस्ट्रार आर. बी. जोग, पाच महाराष्ट्र बटालियन प्रमुख कर्नल मानस दीक्षित, सुहास काळे, अपूर्वा शेलार यांचे प्रोत्साहन लाभले.

२ पुण्य नगरी

शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# 'डॉ. डी. वाय. ज्युनिअर कॉलेज'ला 'बॅडमिंटन'चे विजेतेपद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

डॉ. डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज मुलींच्या संघाने शालेय जिल्हास्तरीय (महापालिका) शासकीय बॅडमिंटन क्रीडा स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक पटकावला. या संघाची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या संघात आदिती नरके, राधिका काणे, हुदा कापडी, मुग्धा पाटील, भार्गवी तोडकर यांचा समावेश आहे. या संघाने उपांत्य फेरीत कमला कॉलेज संघावर आणि अंतिम फेरीत विवेकानंद कॉलेजच्या संघावर विजय मिळवला. विजयी संघाला संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, विश्वस्त आमदार ऋतुराज पाटील, अशोकराव देसाई, प्राचार्य ए. बी. पाटील यांचे प्रोत्साहन आणि जिमखाना विभागप्रमुख प्रा. सुदर्शन पोवार यांचे मार्गदर्शन लाभले.

30/08/24

30/8/24

# प्राध्यापक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान असायला हवेत : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** प्राध्यापक हे विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक दृष्टिकोन असणारे प्रेरणास्थान असायला हवेत. विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी भावनिक बुद्धिमत्ता प्रत्येकामध्ये निर्माण व्हायला हवी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या सॉफ्ट स्किल्स ट्रेनर डॉ. वैशाली शिंदे यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयक्यूएसी व इंग्रजी विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्राध्यापकांसाठी 'नॅकला सामोरे जाताना' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. आर. आर. कुंभार होते. पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे प्राध्यापकांनी नॅक पियर टीमला सामोरे जाताना कोणत्या बाबींचा अभ्यास आणि विचार करायला हवा, याबाबत शिंदे यांनी मार्गदर्शन केले. इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी प्रास्ताविक केले. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले.

07/08/2024

7/8/24

# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांचे उद्देश समजून घेणे महत्त्वाचे : प्राचार्य डॉ. सपाटे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शिक्षण धोरणाच्या धर्तीवर अभ्यासक्रमांमध्ये बदल होत आहेत. धोरण विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर अधिक भर देणारे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांनी शिकत असलेल्या अभ्यासक्रमांमधील कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधे आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रा.अतिश तानगावडे यांची एमपीएससीव्दारे जिल्हा सांख्यिकी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल व प्रा. आशियाना मकानदार यांची एमएच-सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. वर्षा शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रज्ञा कुंभार यांनी आभार मानले. निरुपमा देसाई, सायली शिराळे, दर्शन कणिरे यांनी सूत्रसंचालन केले. रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

23/08/24

23.8.24

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४

# 'विवेकानंद'चे तीन छात्र थल सैनिक कॅम्पसाठी रवाना

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील एनसीसी विभागातील तीन छात्रांची दिल्ली येथील थल सैनिक कॅम्पसाठी निवड झाली. सेला रेगे, चेतन पवार, सार्थक कुलकर्णी हे थल सैनिक कॅम्पसाठी रवाना झाले आहेत. निवडीबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी अभिनंदन केले.

सकाळ

कोल्हापूर, शुक्रवार, २ ऑगस्ट २०२४

# वृक्षसंवर्धनासाठी चळवळ हाती घ्यावी : सयाजी शिंदे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : सध्या विकासाच्या नावाखाली हजारो झाडे कापली जात आहेत, एकही जंगल सुरक्षित राहिलेले नाही. पर्यावरणाच्या ऱ्हास हा प्रश्न गंभीर बनला आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या लाखो विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची चळवळ हाती घ्यावी. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे, असे प्रतिपादन अभिनेते सयाजी शिंदे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील नवीन विद्याशाखा एम. बी. ए. आणि एम. सी. ए.च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी आजच्या काळात रोजगाराच्या संधी कमी होत असताना रोजगार देणारे उद्योजक निर्माण करण्यासाठी एम. बी. ए. आणि एम. सी. ए हे अभ्यासक्रम सुरू करीत असल्याचे सांगितले. संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सिनेकलावंत सुजित शेख यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य वीरेन भिर्डी, आर. के. पाटील, विराज जाधव, अमित आव्हाड, विजय पुजारी, अश्विनी चौगुले, सर्जेराव खोत यांचा सत्कार झाला. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी करून दिली. प्रा. विराज जाधव यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे, प्रा. अशोक पाटील यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी श्रीराम साळुंखे, प्र. प्राचार्य डॉ. महेश गायकवाड उपस्थित होते.



कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील कार्यक्रमात बोलताना अभिनेते सयाजी शिंदे. या वेळी श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे आदी उपस्थित होते.

02/08/24

2/8/24

सकाळ
मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४

# कामगाराचा मुलगा झाला फौजदार

पन्हाळा, ता. ५ : पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या निकमवाडीतील एम.आय.डी.सी.त काम करणाऱ्या तातोबा निकम यांचा मुलगा तुषार तातोबा निकम यांने मंत्रालय सहायक म्हणून नोकरी करत पोलिस उपनिरीक्षकपदी यश मिळविले.

तुषार यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत, माध्यमिक शिक्षक पन्हाळा विद्या मंदिर येथे, तर विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण झाले.



तुषार निकम

त्यानंतर मंत्रालय सहायकपदी कार्यरत होता. त्यांनी नोकरी सांभाळत अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले. वेळेचा सदुपयोग करत मन लावून अभ्यास केला आणि पीएसआयपदी यश मिळविले. आई-वडील, बहीण, भाऊ, मामा आणि नातेवाइकांचे प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांने आवर्जून सांगितले.

सकाळ

गुरुवार, १५ ऑगस्ट २०२४

# शिक्षकांनी सैनिकाप्रमाणे कष्ट करावे

## डॉ. देवळाणकर : डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी कार्यक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : 'आगामी २५ वर्षांच्या अमृतकाळात शिक्षकांनी सीमेवरील सैनिकाप्रमाणे कष्ट केल्यास भारत महासत्ता होईल. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने विवेकानंद विद्यापीठाची स्थापना करून बदलत्या शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय भूमिका घ्यावी. भारतीय ज्ञानपरंपरा आणि कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम यामुळे आपला भारत विकसनशीलतेकडून विकसित भारताकडे जाण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहणार आहे,' असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी येथे केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्राचार्य साळुंखे म्हणाले, "तंत्रज्ञानाचा वापर करून त्यावर स्वार होण्याचे आव्हान शिक्षकांनी स्वीकारले पाहिजे. त्यांनी समाजाभिमुख शिक्षणावर भर द्यावा."



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, श्रीराम साळुंखे, कौस्तुभ गावडे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी कला शिक्षकांच्या कलाकृतीच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. गुणवंत विद्यार्थी आणि सुखदेव पाटील यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाला. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, पदाधिकारी, शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ
, शनिवार, १७ ऑगस्ट २०२४

# 'जरग', 'गोयंका', 'विवेकानंद' विजेते

## शालेय टेबल टेनिस स्पर्धा : विजयी संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १६ : कोल्हापूर महापालिकास्तर शासकीय शालेय टेबल टेनिस स्पर्धेत मुलांमध्ये लक्ष्मीबाई जरग विद्यामंदिर, विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, विद्यापीठ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तर मुलींमध्ये विमला गोयंका इंग्लिश मिडियम स्कूल यांनी विजेतेपद पटकाविले. कोल्हापूर महापालिका व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या या स्पर्धा के.एस.ए. टेबल टेनिस केंद्रात पार पडल्या.



कोल्हापूर : के.एस.ए. टेबल टेनिस केंद्रात झालेल्या शालेय टेबल टेनिस स्पर्धेतील एक क्षण.

**१४ वर्षांखालील** मुलांमध्ये लक्ष्मीबाई जरग विद्यामंदिरने वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात अमृत शिवलकर, संकल्प बांदिवडेकर, तस्लीम मुल्लाणी, तर राधाबाई शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने विद्यापीठ हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत तिसरा क्रमांक पटकाविला.

मुलींमध्ये विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने होलीक्रॉस हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात जान्हवी भोसले, तन्वी चव्हाण, निहारिका कुलकर्णी यांचा समावेश आहे, तर वसंतराव चौगुले इंग्लिश मीडियम स्कूलने माईसाहेब बावडेकर माध्यमिक हायस्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुण मिळवत तिसरा क्रमांक पटकाविला.

**१७ वर्षांखालील** मुलांमध्ये विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने स. म. लोहिया हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणांना पराभव करीत विजेतेपद पटकाविले. विजयी संघात केतन सुतार, वेदांत पाटील,वैभव जोग, शिवम गुप्ता, सोहम चव्हाण यांचा समावेश आहे, तर विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने वसंतराव चौगले इंग्लिश मीडियम स्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव केला.

**१७ वर्षाखालील** मुलांमध्ये विमला गोयंका इंग्लिश मीडियम स्कूलने विद्यापीठ हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव केला. या विजयी संघात निहाली पाटील, दर्शनी ढोले, अनन्या जोशी यांचा समावेश आहे.

**१९ वर्षांखालील** मुलांमध्ये विद्यापीठ हायस्कूल अँड कनिष्ठ महाविद्यालय हा एकच संघ असल्याने विजयी घोषित करण्यात आले. या संघात प्रेमसिंह बाबर, आयुष आयरेकर, धनराज पाटील यांचा समावेश आहे. अंतिम फेरीत विजयी झालेले संघ विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरले.

सकाळ
शनिवार, ३१ ऑगस्ट २०२४

# 'सेंट झेविअर्स', 'शाहू विद्यालय', 'विवेकानंद', 'डी. वाय.' विजयी

## महापालिकास्तर शालेय शासकीय बॅडमिंटन स्पर्धा : शांतिनिकेतन स्कूलचा पराभव

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : महापालिका व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या शालेय शासकीय बॅडमिंटन स्पर्धेत सेंट झेविअर्स हायस्कूल, छत्रपती शाहू विद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेज या संघांनी विविध गटांत विजेतेपद पटकावले.

राजोपाध्येनगर बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेत शहरातील बहुतांशी शाळांनी सहभाग नोंदविला होता. १४ वर्षांखालील गटात मुलांमध्ये सेंट झेविअर्स हायस्कूलने शांतिनिकेतन स्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद मिळवले. विजयी संघात आयुष कदम, रणवीर पाटील, वेद मट्टीमनी, शार्विल मेंच, स्वरेन पाटील यांचा समावेश आहे.



कोल्हापूर : राजोपाध्येनगर बॅडमिंटन हॉलमध्ये झालेल्या महापालिकास्तर १४ वर्षांखालील विजयी सेंट झेविअर्स व छत्रपती शाहू विद्यालय संघासोबत उपस्थित मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात १९ वर्षांखालील विवेकानंद कॉलेज व डी. वाय. पाटील कॉलेजच्या संघासोबत उपस्थित मान्यवर.

मुलींमध्ये छत्रपती शाहू विद्यालयाने (सीबीएसई) होलीक्रॉस हायस्कूलचा दोन विरुद्ध शून्य गुणांनी पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात सुभेदार वनंतरम, इशिता पाटील, प्रिशा मेहता, रिद्धी ओसवाल, ऋषिता पाटील यांचा समावेश होता.

१७ वर्षांखालील मुलांमध्ये छत्रपती शाहू विद्यालय (सीबीएसई) संघाने सेंट झेविअर्स हायस्कूलचा दोन विरुद्ध एक गुणाने पराभव करीत विजेतेपदाला गवसणी घातली. विजयी संघात वेदांत मोरे, वेदांत पाटील, आयुष पाटील, ज्योतिरादित्य घुटे-पाटील, सुजल आडवकर यांचा समावेश होता. मुलींमध्ये शांतिनिकेतन स्कूलने छत्रपती शाहू विद्यालय (एसएससी) संघाचा पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात गार्गी आंबेकर, दिशा जोग, श्रेया कात्रुट, रितिका भोसले, अस्मी उरणकर यांचा समावेश होता.

१९ वर्षांखालील गटात मुलांमध्ये विवेकानंद कॉलेजने छत्रपती शाहू विद्यालय ज्युनिअर कॉलेजचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव केला. विजयी संघात अभिनव हरणे, करण मोकारिया, शिवेंद्र चव्हाण, समीप भातेजा, स्वर्ण भोळा यांचा समावेश होता. मुलींमध्ये अंतिम फेरीत डी. वाय. पाटील ज्युनिअर कॉलेजने विवेकानंद कॉलेजचा दोन विरुद्ध शून्य गुणाने पराभव करीत विजेतेपद पटकावले. विजयी संघात आदिती नरके, भार्गवी तोडकर, मुग्धा पाटील, राधिका काणे, हादी कापडी यांचा समावेश होता.

तरुण भारत

बुधवार, ७ ऑगस्ट २०२४

# निकमवाडीच्या तुषारचे पोलीस बनण्याचे स्वप्न पूर्ण..!

प्रतिनिधी
पन्हाळा

पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी येथील तुषार निकम हा मंत्रालय सहाय्यकपदावर कार्यरत होता. पण त्यांचे स्वप्न होते ते म्हणजे आपल्या अंगावर खाकी वर्दी घालून समाजसेवा करायचे. यामुळे तुषार ने मंत्रालयसहाय्यक पदी कार्यरत असताना मोकळ्या वेळेत अभ्यास करत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परिक्षेत यश मिळवले.



तुषारने प्राथमिक शिक्षण हे गावातीलच विद्यामंदीर शाळेत तर माध्यामिक शिक्षण पन्हाळा विद्यामंदीर येथे घेतले.त्यानंतर ११ वी व१२ वी सायन्स यानंतर बीएस्सी पदवीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये पुर्ण केले. त्याने २०१५ पासुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा अभ्यास सुरु केला. मागील वर्षी त्यांची मंत्रालय

**▪ मंत्रालय सहाय्यक पदावरकार्यरत असताना पोलिस खात्याला पसंती**

सहाय्यक पदी वर्णी लागली. आपल्याला खाकी वर्दी मिळालेली नाही, ही सल त्याच्या मनात होती. त्यामुळे तुषारने या नोकरीसह अभ्यास करत चिकाटी व जिद्दीच्या जोरावर अखेर पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली.तुषारचे वडील एमआयडीसी येथे फॉन्ड्री कामगार तर आई शेती कामावर असायची. यावेळी तुषारचे मामा माजी सरपंच कृष्णात खोत यांनी तुषारला आर्थिक आणि मानसिक आधार दिला.

विशेष म्हणजे तुषारने यासाठी कोणतेही क्लास लावले नव्हते. .यासाठी त्याला कायदा तज्ञ उत्तम पवार यांचे मार्गदर्शन तर भाऊ तेजस निकम याची साथ मिळाली. त्यांच्या या यशामुळे त्यांचे परिसरात कौतुक होत आहे.

07/08/2024

7/8/24

तरुण भारत
बुधवार, ७ ऑगस्ट २०२४



कोल्हापूर : प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते मयत सभासदांच्या वारसांना धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

# 'सभासद कल्याण व विमा'तून वारसांना ६.६१ लाखांची मदत

- श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या पतसंस्थेत कार्यक्रम

प्रतिनिधी
कोल्हापूर

येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या सहकारी पतसंस्थेचे सभासद संभाजी गवसे यांनी पतसंस्थेकडून दहा लाखाचे कर्ज घेतले होते. त्यांनी पतसंस्थेचे कर्ज मंजुरी धोरणानुसार सभासद कल्याण ठेव योजना व विमा योजनेमध्ये सहभाग घेतला होता. त्यांचे ११ मे २०२४ रोजी आकस्मित निधन झाले. त्यांच्या वारसांना कल्याण ठेव योजनेमधून २ लाख व विमा योजनेतून ६ लाख रूपयांइतके अर्थसहाय्य उपलब्ध झाले.

या रकमेमधून संस्थेकडील कर्जाची रक्कम वजा जाता उर्वरित ६ लाख ६१ हजार रूपयांइतक्या रकमेचा धनादेश गवसे यांच्या वारसांना संस्था कुटुंबप्रमुख, प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी पतसंस्थेकडून उपलब्ध केलेल्या योजनांमुळे एखाद्या सभासदांचे आकस्मित निधन झाल्यास सभासदांच्या पश्चात त्यांच्या वारसांना मिळणाऱ्या अर्थसहाय्याचा विचार करता ही योजना अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे पतसंस्थेच्या जास्तीत जास्त सभासदांनी दोन्ही योजनांमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

तरुण भारत संवाद
शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४
कोल्हापूर दिनांक पान ४

# गुणवत्तेसाठी शिक्षकांनी दक्ष राहणे आवश्यक

## राज्य उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेंना स्मृतिदिनी अभिवादन



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी गुरूवारी आयोजित कार्यक्रमात बोलताना उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. सोबत कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे आदी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

सध्याच्या पालकांना गुणवत्ता, दर्जात्मक पद्धतीचे शिक्षण हवे आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी रांगा लागत असताना शासकीय अनुदानित विद्यापीठांना विद्यार्थी मिळत नसल्याचे चित्र आहे. स्पर्धेच्या युगात ही परिस्थिती आणखी वाढत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षकांनी काळानुसार स्वत:मध्ये बदल करून दक्ष राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनी गुरूवारी त्यांना संस्थेच्या प्रांगणात अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यावर डॉ. शैलेंद्र देवळाणकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्राने पद्धतशीरपणे हे धोरण दोन टप्प्यात राबवल्याने देशभर महाराष्ट्र रोल मॉडेल ठरत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची देशाला विकसित भारताकडे घेऊन जाण्यास मदत होणार आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये आपले विद्यार्थी शिक्षण घेऊन शुल्कातून त्यांचा जीडीपी वाढवत आहेत. हे विद्यार्थी का बाहेर जात आहेत, याचा विचार करणे गरजेचे आहे. शिक्षकांना अस्तित्व टिकवण्यासाठी आता बदलावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, विवेकांनद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून यशाची घोडदौड कायम आहे. ज्ञान व विज्ञानाचा विचार देत बापूजींनी अनेक शिक्षक कार्यकर्ते घडवले. विज्ञान आणि अध्यात्म यांना त्यांनी एकसंधपणे पुढे नेले. त्यांच्या विचाराचे आचरण करत प्राध्यापकांनी काम करावे. आपल्या संस्थेचा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी प्रत्येकांने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

### 'विवेकानंद'ने विद्यापीठाकडे वाटचाल करावी

विवेकानंद शिक्षण संस्थेने विद्यापीठाकडे वाटचाल करावी, स्वामी विवेकांनद संस्था ही राज्यातील नामांकित शिक्षण संस्था आहे. या संस्थेची तीन समूह विद्यापीठे होऊ शकतात. त्यांच्यात ती क्षमता आहे. त्यामुळे या संस्थेने स्वायत्तमध्ये न अडकता आता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी. त्यासाठी लागेल ती मदत करु, अशी ग्वाही डॉ. देवळाणकर यांनी दिली.

शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सुत्रसंचालन केले. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी सुखदेव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सहसचिव (अर्थ) सिताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, संस्थेचे आजी, माजी पदाधिकारी, विविध शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद
शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४
कोल्हापूर दिनांक पान ४

# गुणवत्तेसाठी शिक्षकांनी दक्ष राहणे आवश्यक

## राज्य उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेंना स्मृतिदिनी अभिवादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सध्याच्या पालकांना गुणवत्ता, दर्जात्मक पद्धतीचे शिक्षण हवे आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी रांगा लागत असताना शासकीय अनुदानित विद्यापीठांना विद्यार्थी मिळत नसल्याचे चित्र आहे. स्पर्धेच्या युगात ही परिस्थिती आणखी वाढत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षकांनी काळानुसार स्वत:मध्ये बदल करून दक्ष राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनी गुरूवारी त्यांना संस्थेच्या प्रांगणात अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यावर डॉ. शैलेंद्र देवळाणकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्राने पद्धतशीरपणे हे धोरण दोन टप्प्यात राबवल्याने देशभर महाराष्ट्र रोल मॉडेल ठरत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची देशाला विकसित भारताकडे घेऊन जाण्यास मदत होणार आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये आपले विद्यार्थी शिक्षण घेऊन शुल्कातून त्यांचा जीडीपी वाढवत आहेत. हे विद्यार्थी का बाहेर जात आहेत, याचा विचार करणे गरजेचे आहे. शिक्षकांना अस्तित्व टिकवण्यासाठी आता बदलावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी गुरूवारी आयोजित कार्यक्रमात बोलताना उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. सोबत कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे आदी.

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, विवेकांनद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून यशाची घोडदौड कायम आहे. ज्ञान व विज्ञानाचा विचार देत बापूजींनी अनेक शिक्षक कार्यकर्ते घडवले. विज्ञान आणि अध्यात्म यांना त्यांनी एकसंधपणे पुढे नेले. त्यांच्या विचाराचे आचरण करत प्राध्यापकांनी काम करावे. आपल्या संस्थेचा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी प्रत्येकांने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

### 'विवेकानंद'ने विद्यापीठाकडे वाटचाल करावी

विवेकानंद शिक्षण संस्थेने विद्यापीठाकडे वाटचाल करावी, स्वामी विवेकांनद संस्था ही राज्यातील नामांकित शिक्षण संस्था आहे. या संस्थेची तीन समूह विद्यापीठे होऊ शकतात. त्यांच्यात ती क्षमता आहे. त्यामुळे या संस्थेने स्वायत्तमध्ये न अडकता आता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी. त्यासाठी लागेल ती मदत करु, अशी ग्वाही डॉ. देवळाणकर यांनी दिली.

शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सुत्रसंचालन केले. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी सुखदेव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सहसचिव (अर्थ) सिताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, संस्थेचे आजी, माजी पदाधिकारी, विविध शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत
सोमवार, १२ ऑगस्ट २०२४

# वैष्णवी खोत सेट परीक्षा उत्तीर्ण



**पन्हाळा :** निकमवाडी येथील वैष्णवी बापू खोत हिने कॉमर्स विभागातून सेट परीक्षेत उत्तीर्ण होऊन उज्ज्वल यश संपादन केले. गावात कॉमर्स विभागातून सेट परीक्षा उत्तीर्ण होण्याचा प्रथम बहुमान तिने मिळवला. वैष्णवी ही विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी असून वडील बापू खोत व विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य अभय कुमार साळुंखे, सचिव गावडे तसेच सर्व प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन मिळाले.